“डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्ष : एक चिकित्सक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्यविद्या शाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी. करीता सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

रंदिल महेश गजेंद्र

मार्गदर्शक

प्रा.डॉ. एल.बी. डोंगरे

सहयोगी प्रा. व राज्यशास्त्र विभागप्रमुख

हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर

जि.नांदेड

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

जुलै २०२१

प्रस्तावना (Introduction)

शोषित, वंचित, दलित समाजाला आशेचा कीरण दाखविणारा मार्गदाता, तमाम भारतीयांच्या जीवनाला वळणे देणारे, संविधानाच्या माध्यमातून सर्वांगिण बदलासाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाचा उधघोष करणारे महामानव वंदनिय डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. वंचित व उपेक्षितांच्या हक्कांसाठी जागतिक साम्राज्यवादी राजवटीलासुद्धा निर्णय घेण्यास भाग पाडणारे एकमेव व्यक्तिमत्त्व होते. ब्रिटिश साम्राज्यशाहीचे दडपण आणि अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांकडे भारतीय संघटना व नेते यांच्या दुर्लक्षामुळे बाबासाहेबांच्या मनात दलित समाजाच्या उत्कर्षासाठी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक, कामगारांच्या भल्यासाठी स्वतंत्र संघटनेची आवश्यकता त्यांच्या मनात घर करून बसली होती. त्यातूनच अस्पृश्य वर्गाला त्यांचे राजकीय हक्क मिळण्याची शक्यता बाबासाहेबांना दिसत होती. परंतु कॉंग्रेस, मुस्लीम लीग आणि ब्रिटिश राजसत्ता यापैकी कोणावरही विश्वास टाकावा अशी परिस्थिती नव्हती. हे वास्तव असले तरी राजकीय सत्तेच्या प्राप्तीसाठी व्यापक राजकारण करावेच लागणार होते आणि अस्पृश्य समाज त्यांच्याकडे आशेने बघत होता. समविचारी स्पृश्य वर्गातील काही मित्रांनी संपर्क साधून राजकीय योजना आखल्या होत्या. अस्पृश्य वर्ग व समविचारी स्पृश्य वर्ग यांच्या एकजुटीचा पहिला प्रयोग म्हणजेच १५ ऑगस्ट १९३६ रोजी ‘स्वतंत्र मजूर पक्ष’ाची स्थापना होय. या पक्षाच्या माध्यमातून भूमिहीन, गरीब कुळे, शेतकरी आणि कामगारांच्या समस्यांना वाचा फोडणे व त्यांना न्याय्य हक्क मिळऊन देण्यासाठी १९३६ च्या निवडणुकीमध्ये १५ आरक्षीत ठिकाणी स्वतंत्र मजूर पक्षाने उमेदवार उभे केले. या निवडणुकीमध्ये पक्षाचे १३ उमेदवार विजयी झाले. या विजयामुळे पुढील भविष्य साध्य करण्याच्या उद्देशाने अस्पृश्यांना समान हक्क देऊन समताधिष्ठित

जीवन जगण्याचा अधिकार मिळावा व अस्पृश्य, दलितवर्गाला कायदेशीर हक्क प्राप्त होण्याच्या दृष्टीने दिल्लीमध्ये देशभरातील अस्पृश्यांची बैठक घेतली.

दलितांचे प्रश्न शासन दरबारी मांडण्यासाठी एखादी संघटना स्थापन करण्याचा निश्चय बाबासाहेबांनी दिल्ली बैठकीत केला होता. त्याच दरम्यान ब्रिटीश कॅबिनेटमंत्री सर स्टेफोर्ड क्रिप्स भारत भेटीवर आले होते. त्यावेळी बाबासाहेबांनी अस्पृश्यांची व्यथा त्यांच्यापुढे मांडली. त्यामुळे क्रिप्सनी एखादा पक्ष स्थापन करण्याची विनंती बाबासाहेबांना केली होती. त्याच धर्तीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांचे संरक्षण व हक्कांसाठी स्वतंत्र राजकीय पक्ष स्थापन करण्याचा मार्ग अनूसरला. त्यासाठी बाबासाहेबांनी दिनांक १७ ते २० जुलै १९४२ च्या दरम्यान नागपूर येथे मद्रासचे राव बहादूर यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन भरविले. या अधिवेशनाला देश भरातून जवळपास ७० हजारपेक्षा जास्त अस्पृश्य जमले होते. या जनसमूदायाला संबोधित करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, आता आपण केवळ हिंदू समाजाचे घटक नाही; तर भारतीय समाजाचे एक स्वतंत्र घटक आहोत. त्यामुळे आपणास स्वतंत्र राजकीय हक्क प्राप्त झाले पाहिजेत; पण आपल्याजवळ आर्थिक बळ व सामाजिक सामर्थ्य नाही, याकरिता आपल्याला राजकीय सत्ता पाहिजे. ही राजकीय सत्ता आपण आपल्या संघटनेच्या बळावर हस्तगत केली तरच आपली प्रगती होईल. त्यामुळे हा आपल्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. त्यावर आपले संपूर्ण लक्ष केंद्रीत केले पाहिजे. यासाठी आपल्याला अखिल भारतीय स्वरूपाच्या संघटनेची गरज आहे. त्याकरिता 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन' नावाच्या पक्षाची स्थापना करीत आहोत. यास ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशन किंवा ए.आय.एस.सी.एफ. असेही म्हटले जाते. भारतातील दलितांचा हा पहिला राजकीय पक्ष होता. याच अधिवेशनामध्ये नागपूर येथे राव बहादूर यांच्या अध्यक्षतेखाली शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाची स्थापना झाली.

शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाच्या माध्यमातून देशभरातील अस्पृश्यांना संघटित करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. त्यामुळे मुंबई, मध्यप्रांत, वऱ्हाड, सिंध, ओरिसा, हैद्राबाद, मद्रास, कर्नाटक, गुजरात, राजस्थान, पंजाब, संयुक्त प्राप्त, बंगाल, बिहार व आसाम इत्यादी ठिकाणी पक्षाच्या शाखा स्थापन झाल्या. त्यामुळे देशभरातील अस्पृश्यांना सर्व जाती-पोटजातींमध्ये वैचारिक अभिसरण व भावनिक एकात्मता निर्माण होण्यास मदत झाली. हा पक्ष एका विशिष्ट जातीच्या लोकांचा नव्हता; तर तो १९३५ च्या कायद्यानुसार तयार केलेल्या अनुसूचित जातीच्या यादीत ४२९ जातींचा उल्लेख असलेल्या त्या सर्व जातींशी संबंधित असलेला हा पक्ष होता. या पक्षाचे २९ जानेवारी १९४३ रोजी कानपूर येथे अदिवेशन भरले होते. यावेळी बाबासाहेब यांनी हिंदुस्थानचे सरकार चालविण्यास हिंदू मूसलमान व दलित हे भागीदार असलेच पाहिजेत, यात जर दलित समाजाला योग्य वाटा मिळाला नाही तर तो मिळविण्यासाठी ते लढा देतील असा इशारा दिला होता.

कानपूर येथील अधिवेशनामध्ये बाबासाहेबांनी प्रमुख १० मागण्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसपुढे मांडल्या होत्या, त्या खालीलप्रमाणे...

१. अस्पृश्यांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करावे.
२. भारतीय घटनेला अस्पृश्य वर्गाची संमती मिळाल्या शिवाय ती मान्य होणार नाही.
३. अस्पृश्यवर्गाच्या शिक्षणासाठी प्रांतिक व मध्यवर्ती सरकारच्या अंदाजपत्रकात तरतूद करणे आणि अस्पृश्यांच्या स्वतंत्र वसाहती स्थापन करण्यासाठी सरकारी पडित जमीनी राखून ठेवणे.
४. जातीय प्रश्न मिटवित असताना सर्व जातीय प्रतिनिधींच्या समोर या प्रश्नांची चर्चा करणे.

५. सर्व अल्पसंख्याकांना समान वागणूक द्यावी.

६. मुस्लिम समाजाप्रमाणे अस्पृश्य वर्गाला प्रांतीय व मध्यवृत्ती कायदेमंडळात आणि कार्यकारी मंडळात स्थान देण्यात यावे.

७. संयुक्त मतदारसंघ रद्द करून त्या ठिकाणी स्वतंत्र मतदार संघाची योजना मान्य करावी.

८. प्रांतीय व मध्यवृत्ती कायदेमंडळात अस्पृश्यांना पुरेशे प्रतिनिधीत्व द्यावे.

९. सरकारी नौकरीत अस्पृश्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा राखून ठेवाव्या.

१०.अस्पृश्यांसाठी स्वतंत्र वसाहती स्थापन करणे.

या मागण्या मान्य करण्यासाठी शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाच्या वतीने पुणे, नागपूर, लखनो आणि कानपूर येथे मोठ्या संख्येने सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. या सत्याग्रह आंदोलनाचा एवढा मोठा प्रभाव होता की, त्यामुळे बाबासाहेबांना व्हाइसरॉयच्या कौन्सिलमध्ये 'मजूरमंत्री' म्हणून नियुक्त केले गेले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गाचा प्रश्न जगाच्या वेशीवर टांगण्यासाठी निरनिराळ्या देशातील वृत्तपत्रांत लेख लिहिले. भारतात युगानुयुगे अस्पृश्य वर्ग असहाय, अपमानकारक अशी दु:खे भोगीत आहे, याकडे जगाचे लक्ष वेधले. त्यांचे कर्तृत्व म्हणजे त्यांच्या बुद्धिमत्तेचे, पांडित्याचे आणि व्यापक कार्याचे उत्तुंग शिखरचे होते. बाबासाहेबांनी जी काही वैचारिक आंदोलने, संघटना आणि पक्ष काढले त्यात श्रेष्ठ मूल्यांचे अधिष्ठान होते. आंदोलने, संस्था आणि पक्ष यामध्ये त्यांचा कोणताही स्वार्थ नव्हता, स्वार्थ होता तो म्हणजे संपूर्ण उपेक्षित मानवतेच्या उत्थानाचा.

संशोधन समस्या (Research of Problem)

संशोधनात समस्या निर्धारण किंवा समस्यासूत्रण ही सामाजिक संशोधनाची प्रथम पायरी होय. सामाजिक समस्या अतिशय जटील स्वरुपाच्या असतात. कारण समस्यांना अनेक पैलू असतात. त्यापैकी कोणत्या तरी एका पैलूची निवड संशोधन अध्यनासाठी करावी लागते. अशा प्रकारच्या संशोधनाच्या सामान्य विषयक्षेत्राचे विशिष्ट संशोधन समस्येत रुपांतर करणे म्हणजे समस्यासूत्रण होय. संशोधन समस्या संशोधनकर्त्यास जाणवणारी एक सैद्धांतिक किंवा व्यावहारिक अडचण होय. साधारणत: समस्यासूत्रणात काही मूलभूत प्रश्नांचा विचार करणे आवश्यक असते. जसे कशाचा अभ्यास करावयाचा आहे? अभ्यासाचे क्षेत्र कोणते? आदी बाबींचा अभ्यास करणे यामध्ये अपेक्षित असते.

भारताला स्वातंत्र्य मिळाले असले तरी आर्थिक, धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्य असल्याखेरीज ते फार काळ टिकणारे नाही असे मानणारे अनेक देशभक्त १९ व्या शतकापासून भारतात होते. इंग्रजी राजवट ही निव्वळ शाप न मानता, ते वरदानही असल्याचे सांगून समाजाची सर्वांगिण सुधारणा व्हावी यासाठी ते प्रयत्न करत असत. ९ डिसेंबर १९४५ रोजी मनमाड येथे केलेल्या भाषणातही याच संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणाले होते की, मुसलमान लोक पाकिस्तान मागत आहेत, कॉँग्रेस स्वराज्य मागत आहे, आम्हालाही स्वराज्य पाहिजे आहे. त्याचे उत्तर मात्र महात्मा गांधी अगर कॉँग्रेसचे लोक देऊ शकले नाहीत. प्रश्न असा आहे की, तुम्ही जे स्वराज्य मागता त्या स्वराज्यात कोणाचे राज्य कोणावर होणार आहे? राज्य कुणी करायचे? आणि ते कोणावर? हिंदुनी अस्पृश्यांवर राज्य करायचे असे काही आहे काय? हिंदुना त्यांचे स्वराज्य मिळेल. परंतु हे स्वराज्य गुलामगिरीचे ठरणारे आहे. सुरवातीपासून मांडलेली ही भूमिका बाबासाहेबांनी शेवटपर्यंत बदललेली नाही. शतकानुशतके ज्ञान, सत्ता आणि संधी यांना पारख्या

झालेल्या निर्धन व निरक्षर सामान्य माणसांना स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय सत्तेचा वाटा मिळावा व विकासाच्या संधी प्राप्त व्हाव्यात यासाठी त्यांनी जीवनाच्या अखेरपर्यंत शक्य तितके प्रयत्न केले. भारतीय समाजात राजकीय सत्तेच्या वाटपामार्फत खराखुरा सापेक्ष बदल होईल असे सत्तांतर बाबासाहेबांना हवे होते. त्यासाठीच त्यांनी शतकानुशतके उपेक्षित असलेल्या समाजाला सत्तेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाची स्थापना केली होती. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाचा अभ्यास करण्यासाठीच **"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्ष : एक चिकित्सक अभ्यास"**हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objectives of Research)

१. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे.
२. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाचे कार्य व व्याप्तीचा अभ्यास करणे.
३. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाच्या दलित व वंचितासाठीच्या चळवळीचा आढावा घेणे.
४. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाच्या यशापयशाचा आढावा घेणे.
५. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाची वर्तमानकाळीन प्रासंगिकता जाणून घेणे.

संशोधनाची गृहीतकृत्ये (Hypothesis of Research)

१. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाला स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालीन घटना घडामोडीची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे.
२. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाने दलित व उपेक्षित नागरिकांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्याबरोबर भारतीय संविधान निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित व वंचिताच्या उन्नतीसाठी बहिष्कृत हितकरणी सभा, समता सैनिक दल, महाडचा सत्याग्रह, मंदिर प्रवेश, मनुस्मृतीचे दहन, पहिली गोलमेज परिषद, दुसरी गोलमेज परिषद, पुणे करार, समाज समता संघ, मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता प्रबोधनाचे शस्त्र, स्वतंत्र मजूर पक्ष, धर्मांतर, संविधान निर्मिती इत्यादी चळवळीच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

४. ज्या उपेक्षित व पिडित लोकांना सत्तेच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाची स्थापना झाली होती. परंतु उपेक्षित व पिडित समाजाने स्वत:ला हिंदू समजून बाबासाहेबापासून चार हात लांब राहिले. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाला निवडणुकीच्या पातळीवर यश आले नसले तरी भारतीय संविधानाच्या माध्यमातून बाबासाहेबांनी उपेक्षित व पिडित लोकांसाठी महत्त्वपूर्ण तरतुदी केल्या.

५. बाबासाहेबांच्या निर्वानानंतर शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षामध्ये फुट पडून पक्षाची अनेक गटात विभागणी झाली. त्यामुळे बाबासाहेबांच्या वैचारिकतेला तढा जाणून त्यांच्या नावाने राजकारण करणारे राजकीय पक्ष मूळ उद्देशापासून भरकटले आहेत.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा (Scope and Limitations of Research)

संशोधन कार्याला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी संशोधनाच्या कार्यक्षेत्राला मर्यादा असणे आवश्यक आहे. संशोधनाला मर्यादा नसेल तर संशोधन हे मूळ गृहीतकापासून दूर जात असते. बाबासाहेबांच्या कार्याची व्यापकता अथांग महासागरासारखी आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाची ऐतिहासिक पार्श्वभमी, भूमिका, कार्य, उद्देश, संघटनात्मक बांधणी आणि त्यांच्यानंतर शेड्युल कास्ट फेडरेशन पक्षाचे झालेले विघटन हा मूळ संशोधनाचा

हेतू राहील. अपवादात्मक परिस्थितीमध्ये इतर काही बाबींचा उल्लेख संशोधनामध्ये येऊ शकतो. ही या संशोधनाची मर्यादा आहे.

संशोधन पध्दती (Research Method)

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या अनेक पद्धती असून प्रस्तुत संशोधनसाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोताचा आधार, ऐतिहासिक लेख, संदर्भग्रंथ, पक्षाचे जाहीरनामे, शासनाचे प्रकाशने, लोकांच्या मुलाखती याचा आधार घेण्यात येईल.

तस्थ संकलन पद्धती (Fact Collection Methods)

तथ्य संकलन म्हणजे एक प्रकारचा दस्तऐवज असते. ज्यात प्रकाशित व अप्रकाशित लिखानाच्या सर्वेक्षणाबद्दल माहिती दिलेली असते. ग्रंथालयामध्ये माहितीच्या स्वरूपावरून जुने ग्रंथ पुस्तके, मासिके, वर्तमानपत्र, शोध निबंध उपलब्ध असतात व संशोधक त्याचे वाचन करून त्याची मांडणी त्यांच्या संशोधनात करतो त्याला सर्वेक्षण असे म्हणतात. सर्वेक्षण करताना संशोधक मुलाखत घेऊनसुद्धा आपले विचार सर्वेक्षणाद्वारे स्पष्ट करत असतो. प्रकाशित लिखाणाच्या माध्यमातून सर्वेक्षण करून संशोधक स्वत:च्या संशोधनाला चालना देत असतो. साहित्यिक सर्वेक्षण संशोधनात खूप महत्त्वाचे ठरते.

संशोधनाला योग्य तो आकार येण्यासाठी संशोधनाशी संबंधित राजकीय नेतृत्व, समाजसुधारक, विविध क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळीच्या मुलाखती घेण्यात आल्या. यांचा आढावा प्रस्तुत संशोधनामध्ये देण्यात आला आहे.

संशोधनाचा आराखडा (Design of Research)

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत पहिल्या प्रकरणामध्ये विषय प्रवेश, संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधनाचे महत्त्व, संशोधन पद्धती, तथ्य संकलन, संशोधनाची मर्यादा इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रस्तुत दुसऱ्या प्रकरणामध्ये शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाची ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेत असताना पक्षाचा स्थापने मागील उद्देश, भूमिका, हक्क, तत्कालीन सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थिती इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण तिसरे : शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाचे व्याप्ती व कार्य

प्रस्तुत तिसऱ्या प्रकरणामध्ये शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाने तळागाळातील दलित व उपेक्षित जनतेला त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी केलेला संघर्ष, संपूर्ण भारतभर विस्तारलेल्या कार्याची व्याप्ती यांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण चौथे : शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे दलित व वंचितासाठीच्या चळवळी

प्रस्तुत चौथ्या प्रकरणामध्ये शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाने सामान्य घटकांपर्यंत लोकशाहीचे पाळेमुळे पोहोचण्यासाठी विविध पातळीवर केलेले आंदोलने व चळवळीना भक्कम पाठिंबा दिला. यांचा सवीस्तर अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण पाचवे : शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाचे यश-अपयश व प्रासंगिकता

प्रस्तुत पाचव्या प्रकरणामध्ये शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाने भारतात राजकीय, धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक पातळीवर केलेल्या कामाचे यश-अपयशाचा आढावा घेऊन समकालीन परिस्थितीत पक्षाच्या ध्येय धोरणाची प्रासंगिकता करण्यात येईल.

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत सहाव्या प्रकरणामध्ये संशोधनाअंती हाती आलेल्या निष्कर्षाचा तपशील देण्यात येईल.

संदर्भग्रंथ सूची :-

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, (अनुवाद-शिंदे गौतम), बुद्ध की कार्ल मार्क्स, सुगावा प्रकाशन, पुणे, २०१३
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, (अनुवाद-बी.सी. कांबळे), अस्पृश्य मुळेचे काणे आणि ते अस्पृश्य कसे बनले?, सुगावा प्रकाशन, पुणे, २०१०
३. गायकवाड प्रदिप (संपादक), शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचा अहवाल, १९४२, समता प्रकाशन नागपूर, २०१२
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, हिंदुत्वाचे कोडे, सुगत प्रकाशन, नागपूर, २००८
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, (अनुवाद-आझाद रामगोपाल), भारतीय श्रमिक आंदोलन दशा, दिशा और दलित परिप्रेक्ष्या, समता प्रकाशन, नागपूर, २००६
६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, (अनुवाद-शिंदे गौतम), जातिप्रथेचे विश्वंसन, सुगावा प्रकाशन, पुणे, २००५
७. प्रा. देशपांडे म.द., डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार, लोकवाड्.मय गृह मुबई, २०१३

८. पाटील मनोहर, फुले आंबेडकरी चळवळीचे क्रांतिशास्त्र, सुगावा प्रकाशन, पुणे २०१०

९. महेश शिरपुरकर, भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया, संपादक युनिक अॅकॅडमी, पुणे

१०.गायकवाड प्रदिप, महाडचा सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन, क्षितीज पब्लिकेशन, नागपूर, २००७

११.प्रा.डॉ. काळे (संपादक), आंबेडकरी चळवळीची वाटचाल एक चिंतन, निर्मिती विचारमंच, कोल्हापूर, २०१०

१२.डॉ. साळवे मधुकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची सामाजिक, राजकीय, धार्मिक चळवळ, नालंदा प्रकाशन, भोर, २०१०

१३.व्ही.बी.पाटील, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती

१४. पी.एल.भांडारकर, सामाजिक संशोधन पध्दती, हिमालय पब्लिकेशन हाऊस, दिल्ली

१५. गुरूनाथ नाडगोडे, सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर

१६. प्रा.एस.डी.दराडे, संशोधन पद्धती, प्रशांत प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती

१७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, (संकलन- संपादक गायकवाड प्रदिप), मुकनायक आणि बहिष्कृत भारत, अग्रलेख, क्षितिज पल्बिकेशन, नागपूर

१८. डॉ. कसबे रावसाहेब, आंबेडकरवाद : तत्त्व आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन, पुणे, २००४

१९.डॉ. माने भगवान, आंबेडकरी राजकीय चळवळीचे भवितव्य आणि दलितांचे राजकारण, सुगावा प्रकाशन, पुणे

२०. Kothan C.R., Research Methodology, Methods and Techaigues, New Delhi, Age International Publisher.

२१. A.Y. Darshankar, Leadership in Panchayati Raj, Panchsheel Parkashan.

२२. N.Jayapalan, Rural Sociology, Atlantic Publishers and Distributors, New Delhi, २००२

२३. John H. Kessel George F., Last.G.Lelingman The Study of Political Leadership micropolitics Ed. By. Cole Robert G.Seding Published by Holt Rinahart & Winstornn The New York १५७०

२४.Strategies and Spoils A Social Anthropology of Politics By P.G. Bailey Basil Balckwell Publisher Ltd. Oxford U.K. १८६९

२५. L.B.Keny, Presidential Address, Secreetary, Indian History Congress, १९६७

२६. P.Gisbert, Fundamentals of Sociology, Orient Blackswan Pvt. Ltd, Hyderabad, २०११

२७. www.wikipedia.org

२८. www.political.leadership

संशोधक

रंदिल महेश गजेंद्र

मार्गदर्शक

प्रा.डॉ. एल. बी. डोंगरे

सहयोगी प्रा. व राज्यशास्त्र विभागप्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर जि.नांदेड